अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. २६ जून २०२५ | वर्ष १० वे | अंक ४६ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

## उद्दिष्टांअभावी धान खरेदी केंद्रांवरील खरेदी बंद

### शेतकऱ्यांची धान खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

खरीप हंगामामध्ये निसर्गाच्या लहरीपणामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनात घट झाल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला होता. उन्हाळी हंगामामध्ये धान पिकाचे उत्पादन चांगले होईल या आशेने शेतकऱ्यांनी पाण्याच्या पर्याप्त साधनाने धानाची लागवड केली. त्यानुसार उन्हाळी हंगामामध्ये धानाचे उत्पादन लक्षणीय झाले आहे. त्यामुळे हे धान पीक विकुन खरीप हंगामात झालेले नुकसान भरून निघेल अशी आशा शेतकऱ्यांना होती. परंत मार्केटिंग फेडरेशन द्वारे निश्चित करण्यात आलेले धान खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे व ऑनलाईन नोंदणी बंद केल्यामुळे तालुक्यातील अनेक शेतकरी धान पिक विकण्यापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अतोनात आर्थिक नुकसीचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे सदर धान उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता मार्केटिंग फेडरेशन च्या माध्यमातून उन्हाळी हंगामातील



धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवावे, व ऑनलाईन नोंदणी सुरू करावी अशी मागणी ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.

यावर्षी मार्केटिंग फेडरेशन ने धान खरेदीसाठी प्रति शेतकरी १२ क्विंटल निश्चित केलेले उद्दिष्ट अगदी कमी स्वरूपाचे आहे. या उद्दिष्टाच्या माध्यमातून उन्हाळी हंगामातील अधिक धान लागवडीचा खर्च देखील निघणार नसल्याने हे धान उत्पादक शेतकरी आणखी आर्थिक अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. मागील वर्षीच्या खरेदी निकषानुसार चालू वर्षीचे धान खरेदीचे उद्दिष्ट ठरविणे आवश्यक आहे. या माध्यमातून धान उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याची आवश्यकता आहे. गेली काही वर्षे धान उत्पादक शेतकरी सातत्याने आर्थिक अडचणीत आहेत. उद्दिष्ट त्वरीत न वाढविल्यामुळे शेतकऱ्यांना नाहक कमी भावाने व्यापाऱ्यांना धान विकावा लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान निश्चित आहे. त्यामुळे या मागणी कडे दुर्लक्ष होणे संयुक्तीक नाही. याबाबत शासनाने त्वरित निर्णय घ्यावा व उद्दिष्ट वाढवावे अशी मागणी ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## ऑगस्ट महिन्यापासून मिळणार व्हॉटस्‌ॲपवर सातबारा

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यातील शेतकरी आणि नागरिक यांना जमिनीशी संबंधित सातबारा, ८ अ ही जमिनीशी निगडित असलेली कागदपत्रे आता ०१ ऑगस्टपासून ‘व्हॉट्सॲप’वर मिळणार आहेत. त्यासाठी भूमिअभिलेख विभागाने पुढाकार घेतला असून, या विभागाचे डिजिटल क्रांतीच्या दिशेने आणखी एक पाऊल पडले आहे.

राज्यातील शेतकरी, नागरिकांना जमिनीशी संबंधित कागदपत्रे मिळवण्यासाठी सेतू केंद्रांचे उंबरठे झिजवावे लागतात. त्यासाठी हजारो रूपये मोजावे लागतात. ही बाब लक्षात घेऊन भूमिअभिलेख विभाग शेतकरी, नागरिकांना व्हॉट्स ॲपवर सातबारा, ८ अ उतारा, ई-रेकॉर्ड ही कागदपत्रे उपलब्ध करून देत आहे. त्यासाठी माफक शुल्कात नोंदणी करता येणार आहे. महाभूमी संकेतस्थळावरून ही सुविधा थेट संबधितांच्या मोबाईल क्रमांकावर उपलब्ध होणार आहे. यातून सुविधाकेंद्र तसेच खासगी व्यक्तींना अतिरिक्त पैसे देण्याची गरज भासणार नाही.

राज्यात सातबारा उतारे आता ऑनलाइन उपलब्ध आहेत. ते मिळविण्यासाठी केवळ १५ रुपये शुल्क भरून ही सुविधा घेण्यात येते. मात्र, यासाठी शेतकरी, नागरिक यांना सेतू किंवा महा-ई सेवा केंद्रावर जाऊन १५ रुपयांच्या शुल्काव्यतिरिक्त जादाचे पैसे मोजावे लागतात. त्यातही हा उतारा किंवा दाखला संबंधितांच्या संगणकावर डाऊनलोड होतो. त्यानंतर पेनड्राईव्हमधून तो शेतकऱ्याला घ्यावा लागतो. यात या उताऱ्याचा गैरवापर होण्याची भीती असते. त्यासाठी भूमीअभिलेख विभागाने ही सुविधा व्हॉट्स ॲपवरून देण्याचे योजले आहे. महाभूमी संकेतस्थळावर मोबाईल क्रमांक टाकल्यास केवळ १५ रुपयांत सातबारा आणि ८ अ उतारा थेट व्हॉट्सॲप क्रमांकावर मिळणार आहे. यामुळे हा उतारा संबंधित शेतकऱ्याला सोयीनुसार वापरता येईल. उताऱ्याची सुरक्षितता कायम राहून त्याचा गैरवापरही थांबेल. या उताऱ्यासह मिळकत पत्रिका ई-रेकॉर्डमधील दाखलेही मिळणार आहेत.

### ‘महाभूमी’ ॲपवर करावी लागणार नोंदणी

भूमिअभिलेख विभागाची ही सेवा तीन स्तरांवर देण्यात येणार आहे. त्यात माहिती, सुविधा आणि सूचना यांचा समावेश आहे. यासाठी शेतकऱ्यांना महाभूमी संकेतस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे. त्यात त्याच्या जमिनीशी संबंधित असलेल्या अधिकार अभिलेखाची नोंद आवश्यक असेल. अर्थात जमीनमालक असल्याचा पुरावा असणे आवश्यक असेल. नोंदणीसाठी ५० रुपयांचे शुल्क भरावे लागणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना ही सेवा उपलब्ध होईल. त्याचबरोबर नागरिकांना त्यांच्या जमिनीशी संबंधित विविध शंका व चौकशीसाठी त्वरित मदत मिळणार आहे. प्रश्नोत्तराच्या स्वरूपात ही सेवा देण्यात येणार असून, भूमिअभिलेखाशी संबंधित कायदे, प्रक्रिया, कागदपत्रांची उपयोगिता यांची माहिती देण्यात येईल. तसेच जमिनीच्या नोंदीत बदल झाल्यास, संबंधित मालकाला त्याची सूचना थेट व्हॉट्सॲपवर मिळणार आहे. यामध्ये जमिनीची मोजणी, फेरफार, नकाशा बदल आदीसंबंधीच्या नोटीसांचा समावेश असेल.




- ब्रम्हपुरी समाचारमध्ये
जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

## संपादकीय...

# कोचिंग क्लासेसला एकात्मिक चाप

शाळा आणि महाविद्यालयांना समांतर अशी यंत्रणा उभी करीत मोठे झालेल्या कोचिंग क्लासना आणि ‘इंटिग्रेटेड क्लास’ या गोंडस नावाने प्रचलित झालेल्या एकात्मिक वर्गांना चाप लावण्याची केंद्र सरकारची भूमिका स्वागतार्ह आहे. क्लासचे नियंत्रण आणि नियमन यांसाठी केंद्रीय उच्च शिक्षण सचिव विनीत जोशी यांच्या अध्यक्षतेखालील समिती उपाययोजना सुचविणार आहे. मात्र, कोचिंग क्लासना चाप लावण्याची भूमिका घेण्याची किंवा उपाययोजना आखण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. गेल्याच वर्षी केंद्र सरकारने कोचिंग क्लाससाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. सोळा वर्षांखालील मुलांना कोचिंग क्लासमध्ये प्रवेश न देण्याची अटही सरकारने घातली होती. प्रत्यक्षात त्यातील कशाचीही अंमलबजावणी झाली नाही. त्याच्याही आधी राज्य सरकारने खासगी क्लासवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तो अपयशी ठरला. त्यामुळे आता केंद्राने नियमनासाठी पुन्हा पाऊल उचलले आहे. या निमित्ताने कोचिंग क्लास आणि ‘इंटिग्रेटेड क्लास’ यांची चर्चा ऐरणीवर आली हेही नसे थोडके.

देशातील कोट्यवधी मुलांशी संबंधित असलेल्या कोचिंग क्लासकडे खरे तर गांभीर्याने पाहायला हवे. एके काळी कोचिंग क्लास लावणे कमीपणाचे मानले जायचे; अभ्यासात गती नसलेल्यांसाठी शिकवणीचे वर्ग असल्याचेही मानले जायचे. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली असून, कोचिंग क्लास अपरिहार्य असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले आहे. तसे होण्यात शिक्षण खात्यापासून क्लास चालविणाऱ्यांपर्यंतचे ‘अर्थ’पूर्ण संबंध असले, तरी या क्षेत्रातील गैरप्रकार आणि अपप्रवृत्ती दूर करण्यासाठी खूप आधीपासून प्रयत्न व्हायला हवे होते. उशिरा का होईना आता प्रयत्न होतो आहे, हे चांगलेच; परंतु त्याचे यशापयश अंमलबजाणीवर अवलंबून असेल. गेल्या तीन दशकांत देशातील शिक्षण क्षेत्राचे रूपांतर औद्योगिक क्षेत्रात झाले. या उद्योगातील आर्थिक उलाढालीचे आकडे फुगत आहेत. या शिक्षण उद्योगातील एक प्रमुख घटक म्हणजे कोचिंग क्लास. प्रवेश परीक्षांपासून स्पर्धा परीक्षांपर्यंत सर्व पातळयांवर कोचिंग क्लासशिवाय मोठे यश मिळविता येत नसल्याचे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले गेले आहे. त्यातूनच या क्लासचे जाळे देशभर विणले गेले. सध्या त्यातील उलाढाल सुमारे साठ हजार कोटी रुपयांची असल्याचे मानले जाते. या क्लासचे जाळे देशभर विणले गेले. सध्या त्यातील उलाढाल सुमारे साठ हजार कोटी रुपयांची असल्याचे मानले जाते. पुढील पाच वर्षांत ही उलाढाल दीड लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल, असा अंदाज एका अहवालात वर्तविण्यात आला आहे. इतक्या मोठ्या रकमेच्या या क्षेत्रात अपप्रवृत्तीही बळावल्या असून, प्रश्नपत्रिका फोडण्यापासून निकालात गैरप्रकार घडवून आणण्यापर्यंतच्या घटना घडत आहेत.

गेल्या वर्षी वैद्यकीय प्रवेश परीक्षा अशा गैरप्रकारांमुळे रद्द करावी लागली होती. यामध्ये सर्वसामान्य विद्यार्थ्यांची मात्र परवड होते. ती थांबविण्यासाठी कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारने नेमलेल्या समितीने याची पूर्तता करायला हवी. शिक्षण हे ज्ञानदानाचे क्षेत्र असल्याने ते राजकारणापासून मुक्त असायला हवे, अशी अनेकांची भाबडी समजूत असते. प्रत्यक्षात शिक्षण हीदेखील एक राजकीय प्रक्रियाच आहे. शिक्षणासाठी आर्थिक तरतूद करण्यापासून काय शिकवायचे आणि काय शिकवायचे नाही हे ठरविण्यापर्यंत राजकारणच होत असते. एकूणच शैक्षणिक यंत्रणांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न सत्ताधारी करीत असले, तरी शिक्षणावरील एकूण खर्च मात्र वाढविला जात नाही. वास्तविक शिक्षणावरील खर्च ही प्रत्यक्षात भविष्यासाठीची गुंतवणूक असते. एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीडीपी) सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची शिफारस कोठारी आयोगाने केली होती. मात्र, त्याची आजवर अंमलबजावणी झालेली नाही. शिक्षणावर ‘जीडीपी’च्या तीन टक्के रक्कमच खर्च केली जाते. त्यामुळे खासगी शिक्षण संस्था वाढत गेल्या. किंबहुना खासगी शिक्षण संस्थांना अनुकूल अशी धोरणे अवलंबली गेली. राजकीय नेत्यांपासून उद्योगपतींपर्यंत अनेक मंडळी शिक्षण क्षेत्रात उतरली. यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले हे खरे; परंतु यामुळे शिक्षणाला बाजारपेठेतील वस्तूचे स्वरूप प्राप्त होत गेले हेही तितकेच खरे. खासगी संस्थांची नफेखोरीही वाढत गेली. विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे आर्थिक शोषण करून अनेक संस्था मोठ्या झाल्या. आता तर ‘इंटिग्रेटेड’ भूमिका घेत कोचिंग क्लासचालक शाळा-महाविद्यालयांना दुय्यम स्थान देत आहेत. शिक्षणातील अशा अपप्रवृत्तींना चाप लावण्यासाठी ‘इंटिग्रेटेड’ म्हणजेच एकात्मिक उपायांची आवश्यकता आहे.

# योग हा जीवनाचा अविभाज्य भाग असावा - डॉ. सुभाष शेकोकर

ब्रम्हपुरी/का.प्र.

‘योगाचे मानवी जीवनात अनेक फायदे आहेत. करे योग रहे निरोग आजची जीवनशैली




बदलली आहे. या बदलत्या काळात योग हा जीवन जगण्याची शैली असली पाहिजे असे मार्मिक मार्गदर्शन ने.हि. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपुरी येथे केले.

सदर कार्यक्रम नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था ब्रम्हपुरीचे सचिव अशोकजी भैया यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून सतीश मासाळ तहसीलदार, ब्रम्हपुरी, प्रमोद बानबले पोलिस निरीक्षक, ब्रम्हपुरी. डॉ. एम.एस. वरभे प्राचार्य, शांताबाई भैया महिला महाविद्यालय, ब्रम्हपुरी, मेजर विनोद नरड, योग शिक्षक भगवान पालकर, नरेश ठक्कर, सुरेश तलमले पतंजली योग समिती ब्रम्हपुरी, कॅप्टन डॉ. कुलजीत कौर गील, कॅप्टन प्रा. अभिजित परकरवार व डॉ. प्रकाश वट्टी रासेयो कार्यक्रमाधिकारी इ. मान्यवर उपस्थित होते.

यावेळी भगवान पालकर यांनी अगदी हसत खेळत योग, प्राणायाम व ध्यान याविषयी प्रात्यक्षिकाव्दारे माहिती दिली. तर नरेश ठक्कर यांनी पाच सामाजिक पंच तत्व सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन कॅप्टन डॉ. के.के. गील यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रकाश वट्टी यांनी केले. कार्यक्रमाला एनसीसी कॅडेट गर्ल्स, बाईज, स्वाभिमानी संघटना, ब्रम्हपुरी शहरातील योगाचार्य महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

# डॉ. लक्ष्मीकांत लाडूकर यांची मास्को, रशियात छाप



ब्रम्हपुरी/का.प्र.

रशियाची राजधानी मास्को येथे कोलोरेक्टल सर्जन या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये संसाधन व्यक्ती म्हणून ब्रम्हपुरीचे सर्जन डॉ. लक्ष्मीकांत लाडुकर यांना आमंत्रित केले होते. त्यांच्या अभ्यासपुर्ण व्याख्यानाने परिषदेतील प्रतिनिधी भारावले असल्याने ब्रम्हपुरीच्या डॉक्टराची मास्कोत छाप पडली आहे.

वैद्यकीय क्षेत्रात दिवसागाणिक आव्हानत्मक बदल घडून येत असतात. त्यासाठी विविध विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात येते. अशीच एक आंतरराष्ट्रीय परिषद रशियाची राजधानी मास्को येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत व्याख्याते म्हणून डॉ. लक्ष्मीकांत लाडुकर यांना बोलविण्यात आले. त्यांनी जगभरातून ८८ देशामधून आलेल्या १८०० सर्जन समोर गुद्द्वार बाह्य जननेंद्रीय मधील भागाची पुन:रचना शस्त्रक्रिया या विषयावर पॉवर पाईटच्या साहाय्याने अभ्यास पुर्ण संवाद साधल्याने जगभरातील सर्जन भावुक झाले होते.

यापुर्वीही त्यांनी विदेशातील अनेक देशात जाऊन आपले योगदान दिले आहे. यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची भरारी

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाद्वारे नुकताच घोषित करण्यात आलेल्या २०२५ च्या पॉलिटेक्निक परीक्षेत महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक, बेटाळा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत कॉलेजच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे.

यामध्ये तृतीय वर्षाच्या स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील कुलक्ष्मी तोंडरे ही ८४.६८ टक्के घेऊन प्रथम आली तर परीक्षेत विद्युत शाखेतील गौरव मंगर हा विद्यार्थी ८४.५६ टक्के घेऊन द्वितीय आला. द्वितीय वर्षातील



ज्ञानेश्वर थलाल याने ८९ टक्के घेऊन द्वितीय वर्षांत पहिले स्थान पटकावले तर कु. निकिता शेंडे हिने ८६ टक्के घेत द्वितीय स्थान पटकावले. प्रथम वर्षाचा एकूण निकाल ९२ टक्के, द्वितीय वर्षाचा ८६ टक्के तर अंतिम वर्षाचा ९४ टक्के निकाल लागला.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र पिसे, प्राचार्य सुयोग बाळबुधे, प्रा. नरेंद्र समर्थ, प्रा.गिरीश साखरे, प्रा. असद शेख, प्रा. राहुल उके व समस्त प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## विनोदिनी

*सागर शनिवारी नखे कापत बसला होता, हे पाहून त्याचे आजोबा म्हणाले, बाळा शनिवारी नखे कापू नयेत.*
*सागर : मी अंधश्रद्धाळू नाही. असल्या कथा मी मानत नाही...*
*आजोबा : ही अंधश्रद्धा नसून व्यवहारीक सोईसाठी केलेला नियम आहे. बघ... शनिवारी नखे कापली तर शनिवारी व रविवारी रात्री बीयरचे कॅन उघडण्यास अवघड जाते तसेच चिवडा चकली वेफरची पाकीटे चटकन उघडता येत नाहीत, आणि नखं कापताना जखम झाली तर रविवारी मटण खाताना बोटाची आग होते.*
*सागर : धन्यवाद आजोबा... हे ज्ञानामृत मला दिल्याबद्दल मी तुमच्या चरणी नतमस्तक आहे...!!!*

# पावसाळ्यापूर्वी रस्त्याला पडलेले खड्डे गिट्टी-बोल्डर किंवा मातीने तरी बुजवा हो...

## अऱ्हेर-नवरगांवसह परिसरातील जनतेची मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यापासून ०६ किलोमीटर अंतरावर असलेल्या अऱ्हेरनवरगांव ते ब्रह्मपुरी या रस्त्यावर दरवर्षी रेतीने भरलेले हायवा ट्रक व ट्रॅक्टर यांच्या वाहतुकीमुळे मोठमोठे खड्डे पडतात , पडलेली आहेत. सहा किलोमीटर अंतरापैकी एक दीड किलोमीटर सिमेंट काँक्रीट चा रस्ता तयार झालेला आहे आणि त्याला हल्ली मोठ मोठ्या भेगा पडलेल्या आहेत. सदर मार्गाची दुरूस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

दोन-तीन महिन्या अगोदर नव्यानेच अंदाजे दीड-दोन किलोमीटर चा निकृष्ट रस्ता डांबरीकरणाने तयार करण्यात आलेला आहे. या रस्त्यावरून मोटार सायकल चालविली असता ती पूर्ण लहरत जाते. तेव्हा समोरून येणाऱ्या एखादा वाहनाला जाऊन आदळते की काय अशी भीती वाटते. डांबरीकरणाचा रस्ता तयार झाला परंतु अजूनही बाजूचे स्लोप मुरुमाने तुटक तुटक अपूर्ण भरण्यात आले त्यामुळे रात्रो वाहनधारकांना गाडी चालवतांना जीवावर उदार होऊन आपले वाहन चालवावे लागते. उर्वरित रस्ता हा खड्डेमय परिपूर्ण वाहतुकीसाठी तयार आहे. या खड्ड्यामुळे रस्त्यावरून वाहन चालवितांना पावसाळ्यात वाहनधारकांना कमालीची कसरत करून आपले वाहन चालवावे लागणार आहे. अन्यथा घसरला की पसरला अशी अवस्था निर्माण झाली आहे.

अऱ्हेरनवरगांव, भालेश्वर, पिंपळगाव (भोसले) या परिसरातील वाहनधारकांचे, शालेय विद्यार्थ्यांचे, कामगार वर्गाचे हित लक्षात घेऊन शासनाने कानाडोळा न करता या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या जनतेच्या प्रवासाची गैरसोय टाळण्यासाठी रस्त्यावरील खड्डे पावसाळा सुरू होण्यापूर्वी जे काही मिळेल माती- गोटा, मुरूम, सिमेंट- काँक्रेटने बुजवून देण्याची मागणी जनतेने केली आहे.

# चुकीच्या नाली बांधकामाची प्रा. देशकर यांचेकडून पाहणी

## कंत्राटदाराला तात्काळ काम थांबविण्याचे आदेश

ब्रह्मपुरी/का.प्र.

शहरातील खिस्तानंद चौक ते वडसा रोडदरम्यान सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणात होत असलेल्या चुकीच्या नाली बांधकामाची माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली. नागरिकांच्या तक्रारीनंतर त्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन बांधकामामुळे होणाऱ्या संभाव्य धोक्याची माहिती घेतली. परिणामी, अधिकाऱ्यांनी ठेकेदाराला तत्काळ काम थांबविण्याचे निर्देश दिले आहेत. बारई तलावाजवळ जुन्या नालीचे मुख बंद करून नवीन नालीचे बांधकाम चुकीच्या पद्धतीने केले जात आहे. त्यामुळे पावसाळ्यात तलावाचे पाणी नागरिकांच्या घरात शिरण्याची शक्यता असून, नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागणार आहे.

या पृष्ठभूमीवर प्रा. देशकर यांनी काम सुरू असलेल्या स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करून एनचएआयच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत बांधकाम थांबवण्याची विनंती केली. त्यांच्या हस्तक्षेपामुळे अधिकाऱ्यांनी ठेकेदाराला तातडीने काम थांबवण्याचे निर्देश दिले. या विषयावर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत लवकरच बैठक घेऊन योग्य तोडगा काढून काम पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे प्रा. देशकर यांनी सांगितले. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश पदाधिकारी प्रा. प्रकाश बगमारे, शहर अध्यक्ष अरविंद नंदूरकर, महामंत्री मनोज भूपाल, जिल्हा सचिव साकेत भानारकर, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, शहर सचिव पवन जयस्वाल, ओबीसी मोर्चा शहर अध्यक्ष प्रा. अशोक सालोटकर, महामंत्री प्रा. दिलीप जुमडे, राजू भागवत यांच्यासह अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# डॉ. धनराज खानोरकर यांना 'पर्यावरण मित्र' पुरस्कार



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख, पत्रकार, प्रसिद्ध लेखक व कवी डॉ.धनराज खानोरकर यांना पर्यावरण संवर्धन व विकास समिती, चंद्रपूर आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे उर्जानगरातील कामगार मनोरंजन भवनात नुकत्याच पार पडलेल्या पर्यावरण संमेलनात मान्यवरांच्या हस्ते 'पर्यावरण मित्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते, दलितमित्र डी.के. आरीकर, हिराचंद बोरकुटे, डॉ.बळवंत भोयर, हरिष ससनकर, डॉ. देव कन्नाके, वैशाली रोहणकर इत्यादी उपस्थित होते.

साहित्य प्रकार कविता व ललित लेखनातून, पत्रकारितेतून डॉ.धनराज खानोरकरांनी पर्यावरण पूरक लेखन करुन जनजागृती करण्याचे कार्य केले. त्यांचे विशेषत: 'मास्तर मातीचे' व 'ओल्या वेलीची विलांटी' या कवितासंग्रहात पर्यावरणावर व शेतीमातीवर अनेक कविता आहेत. याशिवाय ललितबंध 'संजोरी'तही पर्यावरण पूरक लेखन आहे. त्यांचे सहा कवितासंग्रह आणि ललित बंध 'संजोरी' ग्रंथ व संपादित पुस्तके प्रसिद्ध आहेत. या निमित्ताने त्यांना 'पर्यावरण मित्र 'पुरस्काराने सन्मानित केले गेले.

या सन्मानाबद्दल ने.भै. हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया, कार्य. प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, समस्त प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, पत्रकार मित्र, मित्र मंडळाने त्यांचे जाहीर अभिनंदन केले आहे.

# सेतू केंद्रावरील आर्थिक लूट थांबवा - शिवसेना




ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहर व ग्रामीण विभागात सेतू केंद्रावर विद्यार्थी व शेतकऱ्यांना खाजगी कामाकरिता दाखले घेण्यासाठी खूप मोठा आर्थिक भुदंड सोसावा लागत आहे. या नियमबाह्य पद्धतीने शासकीय प्रमाणपत्रासाठी अवाजवी शुल्क आकारल्याने काही नागरिकांना प्रमाणपत्राविना माघारी जावे लागत आहे. त्याबद्दल शिवसेना तालुका प्रमुख नरेंद्र नरड यांनी निवेदन देत नागरिकांची होणारी लूटमार थांबविण्याची विनंती केली आहे.

ब्रम्हपुरी येथील काही सेतु केंद्रांमध्ये शासकीय प्रमाणपत्र (उदा. उत्पन्न, जात, रहिवासी, वृद्धापकाळ निवृत्ती इ.) काढण्यासाठी शासननिर्धारित शुल्कापेक्षा कितीतरी अधिक रक्कम आकारली जात आहे. ही रक्कम विद्यार्थी तसेच सामान्य नागरिकांसाठी परवडणारी नाही व ती पूर्णपणे नियमबाह्य आहे. सदर प्रकारामध्ये संबंधित सेतु केंद्राचे कर्मचारी किंवा दलाल वर्ग सामान्य जनतेकडून १०० ते ५०० रूपये किंवा त्याहून अधिक रक्कम घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, जे की शासनाच्या निर्देशांनुसार अन्यायकारक आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

याविरोधात शिवसेनेच्या वतीने ब्रम्हपुरीचे तहसीलदार सतीश मासळ यांच्यासोबत सविस्तर चर्चा करून लवकरात लवकर सदर प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. अवाजवी शुल्क आकारणाऱ्यांवर संबंधित कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात यावी. नागरिकांसाठी निश्चित शुल्काचा फलक प्रत्येक सेतु केंद्रावर लावण्याचे आदेश देण्यात यावेत. यासंबंधी हेल्पलाइन क्रमांक अथवा तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्रिय करण्यात यावी. अशा मागण्या घेऊन निवेदन देण्यात आले.

यावेळी संजय पारटवार उपजिल्हा प्रमुख, अनुकूल शेंडे विधानसभा प्रमुख, कवळू पिंपळकर उपतालुका प्रमुख, अमोल माकोडे शहर प्रमुख, आकाश शेंद्रे युवा सेना तालुका प्रमुख, गणेश लांजेवार उपस्थित होते.

# काँग्रेसचा महसूल विभागाला इशारा- अवैध उत्खनन थांबवा अन्यथा तीव्र आंदोलन



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील शेतकरी, कामगार, युवक व नागरिक विविध समस्यांनी ग्रासलेले असताना महसूल व वन विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे जनतेचा सरकारवरील विश्वास ढासळत चालला आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारचे दुर्लक्ष, अवैध वाळू उत्खननाचा सुळसुळाट आणि शहरातील नागरी समस्या यामुळे जनतेच्या संतापाला तोंड फुटले आहे. या पार्श्वभूमीवर तालुका काँग्रेस कमिटी, ब्रह्मपुरीने मुख्यमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे, अन्यथा दोन दिवसांत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

काँग्रेसने दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, खरीप हंगाम सुरू असतानाही शेतकऱ्यांना धान्याचा बोनस मिळालेला नाही, कर्जमाफी अंमलात आलेली नाही, आणि कीटकनाशके-खते-बियाण्यांचे वाढते दर शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करत आहेत. सौर ऊर्जेची सक्ती, अन्नदाता शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर मिळणाऱ्या अपुऱ्या भरपाई, मनरेगामध्ये शेतीकामांचा समावेश न होणे आणि हमीभावाचा अभाव अशा प्रश्नांनी शेतकरी त्रस्त झाले आहेत. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच तालुक्यातील वाळू घाटांवर ठेकेदारांकडून परवानगीच्या मुदतीनंतरही उत्खनन सुरू आहे. विना रॉयल्टी वाळू वाहतूक सर्रासपणे सुरू असून महसूल अधिकारीच या लुटीला संरक्षण देत आहेत. या गंभीर प्रकारात संबंधित अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व लोकसेवा शिस्त नियमांतर्गत तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

वनहक्क योजनेतील झाडलावणी व इतर कामांमध्ये 'राधे ऑर्गनायझेशन' या संस्थेने मोठा आर्थिक घोटाळा केल्याचा आरोप करत संस्थेची नोंदणी रद्द करून संचालकांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करावे, यासोबतच मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात काँग्रेसने ब्रह्मपुरी शहरातील भीषण नागरी अडचणींचा पाढा मांडला आहे. अर्धवट गटारी काम, अपूर्ण रस्ते, अपायकारक चिखल, अपुरे मनुष्यबळ, डासांचा उपद्रव, कीटकनाशक फवारणीचा अभाव, अस्वच्छ व अपुऱ्या सार्वजनिक शौचालयांची दुर्दशा, अंधारलेले रस्ते, आणि पाण्याची गढूळ व अपुरी पुरवठा यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

बाजार चौकातील सुशोभीकरणाच्या नावाखाली सुमारे ५० हून अधिक झाडांची तोड होण्याची शक्यता असून, काँग्रेसने तीव्र विरोध दर्शवत झाडांचे जतन करण्याची स्पष्ट भूमिका घेतली आहे. झाडांच्या छायेखाली वाढलेल्या परिसराच्या सौंदर्याला गालबोट लावणाऱ्या कोणत्याही निर्णयाचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

काँग्रेस कमिटीने दिलेल्या दोन्ही निवेदनांची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी तालुका काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एलएमबी स्कुलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन

ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था ब्रम्हपुरी द्वारा संचालित एल. एम. बी. पब्लिक स्कूल ब्रम्हपुरी येथे २१ जुन २०२५ ला आंतरराष्ट्रीय योग दिना चे आयोजन उत्साहात करण्यात आले. यात विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.



'स्वच्छ व स्वस्थ भारत' या संकल्पनेला धरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबविलेला उपक्रम म्हणजेच २१ जुन ला साजरा करण्यात येणारा आंतरराष्ट्रीय योग दिवस होय. या योग दिनाचे महत्वाचे उद्देश हेच की, वाढत्या मनुष्य बळासोबतच नागरिकांचे स्वास्थही सुदृढ राहावे. 'योग करा निरोगी रहा' हा मंत्र जपत शिक्षकांनी शवासन, शल्मासन, भुजंगासन, मकरासन, अर्धपवन मुक्तासन, पूर्ण पवन मुक्तासन, वृक्षासन, उत्कटासन आदी विविध योगासने पुजा मॅडमच्या मार्गदर्शनाखाली केले. ओमकाराच्या उच्चारात मेडिटेशन करण्यात आले.

योग केल्यामुळे केवळ आपल्या अवयवांचीच नाही तर शारिरीक, मानसिक विकासावर विजय मिळविला जाऊ शकतो. याबाबतचे मार्गदर्शन शाळेच्या शिक्षिका पुजा हर्षे मॅडम यांनी केले. त्या आर्ट ऑफ लिविंग ह्या संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या व्यक्तिमत्व विकासाच्या वेगवेगळ्या शिबिरांच्या शिक्षिका आहेत. अशा प्रकारे अत्यंत, रम्य वातावरणात योगासने करून 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्यात आला.

# भाजपा कार्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा बलिदान दिन साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

लोकशाही जीवंत राहण्यासाठी भारतीय जनसंघ नावाच्या एका सशक्त विरोधी पक्षाचे निर्माण करणारे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे असे एकमात्र नेता होते की, ज्यांनी भारत पारतंत्र्यात होता त्या वेळेला देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर जम्मू कश्मीर भारताचे अविभाज्य अंग आहे या मागणीसाठी त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. अशा महान नेत्याचा बलिदान दिन ब्रह्मपुरी येथे भाजपा कार्यालयात ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

याप्रसंगी मान्यवरांनी स्व. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनाबद्दल मनोगत व्यक्त केले. प्रसंगी भाजपा माजी आम. प्रा.अतुल देशकर, भाजपा तालुका अध्यक्ष प्रा. अरुण शेंडे, भाजपा शहर अध्यक्ष अरविंद नंदुरकर, प्रा. प्रकाश बगमारे, मनोज वठे, वंदनाताई शेंडे, वर्षाताई चौधरी, प्रा. संजय लांबे, डॉ.प्रा. अशोक सालोटकर, प्रा. जुमडे, प्रा.चंद्रकांत विटाळकर, राजु भागवत, प्रशांत वसाके, पवन जयस्वाल, , स्वप्नील अलगदेवे, अमित रोकडे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्राचार्य सुयोग बाळबुधे यांनी केले तर उपस्थितांचे आभार साकेत भानारकर यांनी मानले.

# शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील चिंचोली (बु.) येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये दिनांक २३ मे २०२५ रोजी संभाजी ब्रिगेड ग्रामशाखा चिंचोली यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त व प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना बुक, नोटबुक आणि पेनचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, ते शाळेत नियमितपणे येण्यासाठी प्रेरित व्हावेत, तसेच गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात मिळावा या उदात्त हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून रघुनाथ पारधी (माजी पोलीस पाटील), धनंजय मेश्राम (शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष), श्रीधर दुपारे, सुदाम ठाकरे, मुखरन राऊत, वामन ढोरे, जयंत राऊत (ग्रंथपाल), सुधाकर शिंगाडे, मुकुंद शिंगाडे, वच्छला ढोरे, यशोदा पारधी, दिपाली मेश्राम, उषा ढोरे, ममता ढोरे, रविना नाहले, तसेच शाळेचे शिक्षकवृंद आणि अंगणवाडी सेविका यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संभाजी ब्रिगेड ग्रामशाखा चिंचोलीचे अध्यक्ष रुपेश कुथे, उपाध्यक्ष गुरुदेव बुल्ले, सचिव गणेश बगमारे, कोषाध्यक्ष आकाश ठेंगरी, आकाश कुथे, अरविंद बरडे, प्रमोद ढोरे, सचिन गजभिये, अक्षय बरडे, शिवदास बुल्ले, अभिषेक बुल्ले, प्रवीण पारधी आदी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

**जल है तो कल है...**

# ने.हि. विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी द्वारा संचालित नेवजाबाई हितकारिणी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथे 'जागतिक योग दिन' मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य के.एम. नाईक सर हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य ए.डब्ल्यू. नाकाडे सर उपस्थित होते.

जागतिक योग दिनानिमित्त विद्यालयात आयोजित योग प्रात्यक्षिके सिंधीमेश्राम सर, दोनाडकर सर व देशमुख सर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. विविध योगासने, प्राणायाम व श्वसनाच्या तंत्रांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांसमोर सादर करतांना मार्गदर्शकांनी योगाचे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक लाभ तथा योगाभ्यासाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.

नेवजाबाई हितकारिणी विद्यालयाच्या वतीने योग दिनाच्या आयोजनाने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढीस लागली असून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संपूर्ण विद्यालय परिवाराचे योगदान मोलाचे ठरले. सदर कार्यक्रमाला शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रणजीत राऊत सर यांनी केले.

# योगदिनी महिलांचे योगासन व वृक्षारोपण

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. २१ जूनला आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या निमित्ताने ब्रम्हपुरी येथील विजया



पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली शारदा गृहनिर्माण संस्थेतील सर्व महिलांचे योगासन, प्राणायम व वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी विजया पाटणकर यांनी निरोगी आरोग्य जगण्यासाठी सभोवतालचे पर्यावरण व योग- प्राणायाम हे शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या किती उपयुक्त आहे याबद्दल मार्गदर्शन केले.

प्रसंगी मंजुषा बजाज यांनी थोडक्यात योगाचे महत्व सांगून पाटणकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी रिमा सिंग, पदमा कोराणे, मुक्ता राऊत व पुष्पा कडू आदी उपस्थित होत्या.

# डॉ. हर्षे यांना डी.लिट.व गेस्ट ऑफ ऑनरचा सन्मान

ब्रम्हपुरी/का.प्र.

ग्लोबल हुमॅन रिसोर्सेस पीस अॅन्ड फ्रेन्डली रिसर्च इंस्टीट्युट, (इंटरनॅशनल हुर्मन



रिसर्च इंस्टीट्युट) अप्रुव्हड बाय वर्डसर्वथ युनिव्हर्सिटी युनायटेड किंगडम, रॉक युनिवर्सिटी घाना, एशीया डिजीटल युनिवर्सीटी बाली, इंडोनेशीया अॅन्ड गव्हर्नमेंट ऑफ इंडिया रजिस्टर्ड नं. ०२२८५१ तर्फे ४ थे नॅशनल कनव्हेशन अॅन्ड ऑनररी डॉक्टरेट डिस्ट्रीब्युशन प्रोग्राम दि. १४ जुन २०२५ ला हिमालय कला मंदीर दार्जीलींग, पश्चिम बंगाल येथे ब्रम्हपुरी येथील प्रा.डॉ. संजय हर्षे यांना 'गेस्ट ऑफ ऑनर' चा सम्मान अॅड. संजित सिंग, हायकोर्ट मनिपुर व डॉ. चारूमनी हजारीका यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

तसेच एशीया डिजीटल युनिवर्सीटी बाली, इंडोनेशीया तर्फे प्रा.डॉ. संजय हर्षे यांना ऑनररी डि.लीट. पदवी, डॉ. ओ. बीरामनी सिंग रिटायर्ड डेप्टी कलेक्टर अॅन्ड नॅशनल प्रसिडेंन्ट ग्लोबल हुमॅन रिसोर्सेस पीस अॅन्ड फ्रेन्डली रिसर्च इंस्टीट्युट गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, आसाम, यांचे हस्ते प्रदान करण्यात आले. याव्यतिरिक्त ग्लोबल हुमॅन रिसोर्सेस पीस अॅन्ड फ्रेन्डली रिसर्च इंस्टीट्युट, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, तर्फे प्रा. डॉ. संजय हर्षे यांना ऑनररी पीएच.डी. डीग्री, डॉ. ओ. बीरामनी सिंग आसाम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

यापुर्वी प्रा. डॉ. हर्षे यांना 'आचार्य' मानद उपाधी इंटरनॅशनल आयनोवन्स युनीवर्सीटी लंडन (इंग्लंड) तर्फे प्रदान करण्यात आली होती. प्रा. डॉ. हर्षे हे बहुआयामी व्यक्तीमत्व असुन सोशल वर्कर आहेत. त्यांच्या सन्मानाबद्दल ब्रम्हपुरी वासीयांनी त्यांचे मन:पुर्वक अभिनंदन केले.

# स्त्रीरोग निदान व उपचार केंद्राचा वृक्षारोपण करून शुभारंभ

ब्रम्हपुरी/का.प्र.

अल्पावधीत नावलौकिक मिळविलेल्या जे जे मल्टिस्पेशालिटी क्लिनिक परिसरात दि.२० जूनला वृक्षारोपण करून स्त्रीरोग निदान व उपचार केंद्राचा शुभारंभ करण्यात आला.

ब्रम्हपुरी येथील प्रसिद्ध स्त्रीरोग व वंधत्व तज्ञ सुपरस्पेशालिस्ट डॉ. ज्ञानेश्वरी पुस्तोडे (शहारे) MBBS, MS,DNB,FMAS यांच्या स्त्रीरोग निदान व उपचार केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विश्वनाथजी शहारे नागपूर, पांडुरंगजी पुस्तोडे लाखांदुर, प्रा. नामदेवराव जेंगठे, ज्योतीसावित्री पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक शेंडे, डॉ. भूषण शहारे, पॅथालाजिस्ट प्रकाश कापगते, जेजे मेडिकलचे संचालक प्रतीक कोहळे उपस्थित होते.

**... QUOTES ...**

**"Earn your success based on service to others, not at the expense of other."**

**- H. Jackson Brown Jr.**

# ने.हि. कन्या विद्यालयात विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक ने.हि. कन्या विद्यालय ब्रम्हपुरी येथे दिनांक २३ जून २०२५ ला विविध कार्यक्रम




घेऊन नवप्रवेशित विद्यार्थिनींचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पी.व्ही. बनपुरकर मॅडम, प्रशांत सेलोटे पालक प्रतिनिधी, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, दलाल मॅडम, शेंडे मॅडम, पालक प्रतिनिधी शारदा कावळे मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व मान्यवरांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यालयातून सेमी इंग्रजी माध्यमातून प्रथम आलेली कु. विद्या गरुडेश्वर पडोळे, द्वितीय कु. भार्गवी वासुदेव हटवार, तृतीय कु. दिव्यांनी ओमप्रकाश ठेंगरे, चतुर्थ कु. गाथा उद्धव फुलझेले व कु. माही चंद्रशेखर पेलणे, पाचवी कु. तोषवी सुरपाम तसेच मराठी माध्यमातून प्रथम कु. श्रेया नंदलाल पिलारे , द्वितीय कु. अदिती मदन गुरपुडे या सर्व विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांनी केले. उपमुख्याध्यापक निखारे सर यांनी विद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी निर्माण केलेल्या विविध सोयी चा लाभ घ्यावा असे सांगितले. शाळेच्या मुख्याध्यापिका बनपुरकर मॅडम यांनी विद्यालयाच्या विविध क्षेत्रातील यशाची माहिती दिली. यावेळी वर्ग ५वी ची नवप्रवेशित विद्यार्थिनी कु. रमणी सतीश डांगे हिने सुंदर अशा कवितेचे वाचन केले.

यावेळी विद्यार्थिनींना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले व नवप्रवेशितांच्या अनुबंधाने 'स्कूल चले हम' या नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन भुंबर मॅडम व आभार प्रदर्शन कावळे मॅडम यांनी केले.

**चारोळी**

अजून तू मुलींनाच
हसून करतोस विश...
त्यापेक्षा डासांना कर,
जे तुला करतात किस...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# निट परिक्षेत एल.एम.बी. स्कुलच्या सोहन पिसे याचे घवघवीत यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल.एम.बी. पब्लिक स्कुलचा विद्यार्थी सोहन पंढरी पिसे याने सन २०२४-२५ या सत्रात १२ वी सी. बी. एस ई. बोर्ड परिक्षा व नीट परिक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले.

एन. एच. एज्युकेशन सोसायटी गेल्या अनेक वर्षापासुन आपल्या विविध शाखेतून शिक्षणाचा दर्जा अधिकाअधिक उंचावित आहे. या सोसायटी अंतर्गत येणाऱ्या एल. एम. बी.



स्कुल या शाळेमध्ये १२ वी च्या प्रथम वर्षाच्या निकालात सोहन पंढरी पिसे याने प्रथम कंमाक पटकाविला. तसेच निट या परिक्षेमध्ये ९९.१२ टक्के परसेंटाईल घेवून शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला.

त्याने मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका यांचेसह शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सोहन पिसे याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते
(पान क्र. ९ वरून)
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
स्टेनलेस स्टील वर्क्स



गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.




# लाडक्या बहिणींसाठी उघडणार लाडकी बहिण पतसंस्था

ब्रम्हपुरी/का.प्र.

लाडक्या बहिणीला मिळणाऱ्या १५०० रुपयांवर पतीराजांचा डल्ला, अशा आशयाच्या बातम्या नित्याच्या झाल्या आहेत. त्यामुळे बहिणींना मिळणाऱ्या या पैशात त्यांना बचत करण्यासाठी हक्काचे ठिकाण असावे आणि त्यातून त्यांना उद्योग व्यवसाय करता यावा यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून लाडकी बहीण पतसंस्था उभारण्याचा निर्णय शासनाने



घेतला आहे. ही माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

राज्यात गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सरकारने जाहीर केली होती. सरकारच्या या निर्णयावर चौफेर टीकाही झाली. या टीकेमुळे सरकारने लाडक्या बहीण योजनेच्या निकषात काही बदल केले तरी योजना अव्याहत सुरू ठेवण्याची घोषणा वारंवार केली आहे. त्यातून लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या १५०० रुपयांच्या अनुदानरूपी पैशांची बचत व्हावी, त्यांना बचत करण्यासाठी हक्काचे ठिकाण उपलब्ध व्हावे, यासाठी महिला व बालविकास विभागांतर्गत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यभरात लाडकी बहीण पतसंस्थेचे जाळे उभारण्याचे सरकारने ठरविले आहे.

# २७ जुनला कॉंग्रेसचा विराट मोर्चा

ब्रम्हपुरी/का.प्र.

शेतकरी, शेतमजूर, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी यांच्या हितासाठी झोपलेल्या युती सरकारला जाग आणण्यासाठी आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ब्रम्हपूरी तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने दि. २७ जुन रोजी शुक्रवारी सकाळी ११ वाजता तहसिल कार्यालय ब्रम्हपुरी येथे भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

तालुक्यातील संपुर्ण शेतकरी, शेतमजूर, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी यांनी मोठ्या संख्येने मोर्चाकरीता उपस्थित राहण्याचे आवाहन कॉंग्रेसच्या वतीने केले आहे.

# घरफोडी करणारे आरोपी ब्रम्हपुरी पोलिसांकडून जेरबंद





ब्रह्मपुरी/का.प्र.

फिर्यादी गोवर्धन नीलकंठ गायधने वय ४१ हे मराठा लेआउट कूर्झा,ब्रह्मपुरी येथील रहिवासी आहेत. फिर्यादी गोवर्धन गायधने हे दिनांक १७ जून २०२५ रोजी कामानिमित्त बाहेरगावी गेले असताना, रात्रीच्या वेळेस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी गायधने यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. बेडरूम्च्या लॉकरमध्ये ठेवलेले पैसे, सोन्याचे दागिने, असा एकूण ५०,००० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात व्यक्तीने चोरून नेला.

फिर्यादी गायधने यांनी झालेल्या घटनेची ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल झाल्यानंतर ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनचे डि.बी. पथकामार्फत अज्ञात आरोपीचा शोध घेत असताना, पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील आरोपीच सदर गुन्ह्यात सहभाग असल्याबाबत खात्रीशीर गोपनीय माहिती ब्रह्मपुरी पोलिसांना मिळाली. माहिती मिळाल्याने ब्रह्मपुरी पोलिसांनी आपली तपस चक्रे वेगाने फिरवून, आरोपी अनिल रामभाऊ दांडेकर वय ३० राहणार हत्तीगोटा, ब्रह्मपुरी व विकी ज्ञानेश्वर जांगडे वय ३० राहणार नान्होरी ता. ब्रह्मपुरी यांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी, सदर घरफोडी केल्याची कबुली त्यांनी दिली. गुन्हा कबूल केल्यानंतर पोलिसांनी सदर आरोपीना अटक करून आरोपीकडून ७५०० रुपये रोख, चोरी केलेल्या रकमेमधून विकत घेतलेला ५५०० रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल, ५००० रुपये किमतीची एक ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी व १५००० रुपये किंमतीची ३ ग्रॅम वजनाची नाकातील नथ असा एकूण ३३,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही आरोपीस प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता, त्यांना न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. पोलिसांनी दोन्ही आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का, सा. अप्पर पोलीस अधीक्षक रीना जनबंधू, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोसरे, पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनात सहा. पो नि मनोज खडसे, पोहवा योगेश शिवणकर, पो हवा अजय कटाईत , पोना मुकेश गजबे,पोशी स्वप्निल पळसपगार, चंदू कुरसंगे, इरशाद खान,निलेश तुमसरे यांनी केलेली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस नाईक मुकेश गजबे हे करीत आहे.

❀❀❀❀❀❀

बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404